

महावीर जयंती

जगा आणि जगू द्या हा संदेश देणारे भगवान महावीर यांच्या स्मृतीस आज जयंती निमित्त अभिवादन

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com www.aapalavidarbh.com

बुलडाणा ■ वाशिम ■ अमरावती ■ यवतमाळ ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर


### अहिंसेचे प्रतीक भगवान महावीर

जैन धर्माचे चोविसावे तीर्थंकर अहिंसेचे मूर्तिमंत प्रतीक भगवान महावीर यांची आज जयंती. भगवान महावीर यांचा जन्म वैशाली राज्याच्या कुंडलपूर येथे इसवी सन पूर्व ५९९ मध्ये झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सिद्धार्थ तर आईचे नाव त्रिशला असे होते. त्यांच्या भावाचे नाव नंदिवर्धन तर बहिणीचे नाव सुदर्शना असे होते. त्यांचे बालपण राजेशाही थाटात गेले. भगवान महावीर आठ वर्षाचे असताना त्यांना शिक्षण आणि शस्त्र विद्येचे प्रशिक्षण घेण्यासाठी शाळेत पाठवण्यात आले.


>> मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034 >> रविवार दिनांक 21 एप्रिल 2024 >> वर्ष 02 रे >> अंक 211 >> पाने 04 >> किंमत 2 रुपये

Title code: MAHMAR52707


## ठळक...

### पंतप्रधान देशाचे असतात त्यामुळे त्यांनी...; पवारांचा मोदींना खोचक सल्ला

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** : राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपवर जोरदार हल्लाबोल केला आहे. ते छत्रपती संभाजीनगरमध्ये बोलत होते. पंतप्रधान हे देशाचे असतात मात्र भाषण ऐकल्यावर असे वाटले की ते भाजपचे पंतप्रधान आहेत, त्यांनी राष्ट्रीय दृष्टीकोन ठेवला पाहिजे, असा खोचक सल्ला शरद पवार यांनी पंतप्रधान मोदी यांना दिला आहे.

इथे येण्यापूर्वी मोदी साहेबांचे भाषण ऐकत होतो. पंतप्रधान हे देशाचे असतात मात्र भाषण ऐकल्यावर असे वाटले की ते भाजपचे पंतप्रधान आहेत, त्यांनी राष्ट्रीय दृष्टीकोन ठेवला पाहिजे. कधी नेहरू, कधी राहुल गांधींवर टीका करणे सुरूच आहे. तुम्ही देशाचे पंतप्रधान आहात तर तुम्ही काय केलं ते आधी सांगितले पाहिजे. माझ्या हातात सत्ता द्या ५० दिवसात महागाई कमी करू म्हणाले होते, पण महागाई कमी करण्याऐवजी ती वाढली आहे. जीवनाश्यक वस्तूंच्या किमतीमध्ये मोठी वाढ झाली आहे. देशात बेरोजगारांची संख्या वाढली आहे, असा हल्लाबोल शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर केला आहे.

पुढे बोलताना ते म्हणाले की, आज शेतीला पाणी नाही, जनावरांना चारा नाही. फळबाग योजना आम्ही सुरू केली होती, आज पाणी नसल्याने त्या फळबागा जळत आहेत. मात्र देशाचे पंतप्रधान, मंत्री ढुंकूनही बघत नाहीत. राजकर्त्यांना शेतकऱ्यांची चिंता नाही. देशाचे राजकारण योग्य रस्त्यावर आणायला पाहिजे यासाठी देशपातळीवर आघाडी केली, त्यासाठी पक्ष एकत्र आले असल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे.

### छगन भुजबळांसाठी समता परिषद सरसावली घेतला 'हा' निर्णय

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** नाशिक लोकसभा मतदारसंघातून छगन भुजबळ यांना माघार घेण्यास भाग पाडणाऱ्या महायुतीच्या भूमिकेचा निषेध करत अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद भुजबळ यांच्यासाठी सरसावली आहे. यासंदर्भात परिषदेचे संस्थापक छगन भुजबळ यांच्याशी चर्चा करूनच भविष्यातील निर्णय घेण्यात येणार आहे.

नाशिक लोकसभा मतदारसंघातून भुजबळ यांनी निवडणूक लढविण्याचे आदेश पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दिले होते. मात्र, त्या आदेशाची पायमल्ली करीत राज्यातील महायुतीच्या सरकारमधील शुक्राचार्यांनी आठवड्यापेक्षा जास्त कालावधी घेऊन कोणताही निर्णय न घेतल्याने उद्विग्न होत भुजबळ यांनी निवडणुकीतून माघार घेतली आहे. यामुळे राज्यातील ओबीसींना डावलले जात असल्याची भावना ओबीसी बांधवांच्या मनात निर्माण झाली आहे. ओबीसी समाज अस्वस्थ असून त्यांच्यात धुमसत असलेल्या या असंतोषाचा मतदानावर विपरीत परिणाम होऊ शकतो, असा इशारा समता परिषदेचे पुणे विभाग अध्यक्ष प्रितेश गवळी यांनी शनिवारी दिला.

येत्या दोन दिवसांत समता परिषद आणि इतर ओबीसी संघटना बैठका घेऊन विचारविनीमय करणार आहेत. यासंदर्भात छगन भुजबळ यांचा निर्णय अंतिम असून त्यांच्या नेतृत्वाखाली अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे, असे गवळी यांनी सांगितले. मात्र, निवडणुकीतून माघार घेत भुजबळ यांनी स्वत:ची सुटका करून घेतली आहे का?, या प्रश्नाला त्यांनी बगल दिली.

### समलिंगी पतीकडून छळ; महिलेची पोलिसांकडे तक्रार, पतीसह सासू, नणंदेविरुद्ध गुन्हा दाखल

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** पती समलैंगिक असल्याची बाब लपवून महिलेचा शारीरिक आणि मानसिक छळ केल्याप्रकरणी मुंढवा पोलिसांनी पतीसह सासू, नणंदेविरुद्ध गुन्हा दाखल केला. याबाबत एका महिलेने फिर्याद दिली आहे. तिने दिलेल्या फिर्यादीनुसार, पतीसह, सासू, नणंदेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदार महिलेचा जानेवारी २०२२ मध्ये एकाशी विवाह झाला होता. महिलेचे सासर कारवार येथे आहे. सासरी गेल्यानंतर पती समलैंगिक असल्याचे तिच्या निदर्शनास आले. विवाहानंतर महिलेला घरखर्च करण्यास भाग पडले. किरकोळ कारणावरुन महिलेला मारहाण करण्यात आली. >> पान ३

# ४ जूननंतर इंडिया आघाडीचे नेते एकमेकांचे कपडे फाडतील, केस ओढतील

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या सभांचा राज्यात धडाका लागला असून रामटेक, वर्धानंतर आता नांदेड आणि परभणीतही मोदी यांची सभा होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नेहमीप्रमाणे शिवाजी महाराजांचं नाव घेत मराठीतून आपल्या भाषणाला सुरुवात केली. 'छत्रपती शिवाजी महाराज, संत सेवालाल महाराज की जय. सर्वांना राम राम, नांदेड आणि हिंगोलीकरांना माझा नमस्कार' असे पंतप्रधान मोदी यांनी म्हटले. तर पुढे २६ तारखेची तयारी झाली आहे ना? असा प्रश्न विचारत मोदींनी स्थानिकता जपण्याचा प्रयत्न केला. तसेच आपल्या भाषणातून पुन्हा एकदा मोदी यांनी काँग्रेस व इंडिया आघाडीवर हल्लाबोल केला.

''इंडिया आघाडीचे लोक आपला भ्रष्टाचार लपविण्यासाठी एकत्र आले आहेत, हे लोकांनाही समजत आहे.



त्यामुळे पहिल्या टप्प्यातच मतदारांनी इंडिया आघाडीला नाकारले. देशातील २५ टक्के जागांवर इंडिया आघाडीचे पक्ष एकमेकांच्या विरोधात लढत आहेत. जे लोक स्वत:च्या आघाडीवर विश्वास ठेवत नाहीत, अशा लोकांवर देश विश्वास ठेवू शकतो का? जे लोक स्वत:च्या आघाडीतच एकमेकांना तुरुंगात टाकण्याची भाषा करतात, अशा लोकांना लोकसभेत स्थान दिले तर तिथेही ते लोक एकमेकांविरोधात संघर्ष करतील. ४ जूननंतर इंडिया आघाडीचे नेते एकमेकांचे कपडे फाडतील'', असा खोचक टोला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नांदेडच्या प्रचार सभेत लगावला.

### काँग्रेसने विकासाचा गळा घोटला

स्वातंत्र्यानंतर तब्बल ६० वर्षानी कोट्यवधी गरीबांना शौचालय देण्याचं काम आम्ही केलं, त्यावरुनही काँग्रेसने खिल्ली उडवली. गरीब बँक खातं उघडून काय करणार, डिजिटल व्यवहार हा गरीब आणि अडाणी लोकांचं काम नाही, असे काँग्रेसमधील एक बडा नेता म्हणत होता. काँग्रेसवाल्यांना देशातील गरीबांवर विश्वास नाही. मग, तुम्ही काँग्रेसवर विश्वास ठेऊ शकता का?, असा सवाल मोदींनी विचारला. काँग्रेसने महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्याच्या विकासाचा गळा घोटण्याचे काम केले आहे. काँग्रेसच्या धोरणामुळे शेतकरी गरीब झाला, उद्योगवाढीला चालना मिळाली नाही, असे म्हणत काँग्रेस आघाडीवर मोदींनी टीका केली.

राहुल गांधींना वायनाडमध्ये संकट असल्याचे वाटत आहे. २६ एप्रिलमध्ये जसं वायनाडमध्ये मतदान होईल. त्यानंतर, राहुल गांधींसाठी आणखी एका जागेची घोषणा करुन त्यांना तिथून उमेदवारी दिली जाऊ शकते, असे मोदींनी म्हटले. तसेच, केरळच्या मुख्यमंत्र्यांचा दाखल देत काँग्रेस व इंडिया आघाडीला टोला लगावला. काँग्रेसचा परिवारच, या निवडणुकीत काँग्रेसला मत देणार नाही, अशी परिस्थिती आहे. कारण, जिथं ते राहतात तिथे काँग्रेसचा उमेदवारच नाही, अशी परिस्थिती काँग्रेसवर येईल असा कधी कुणी विचार केला होता का, असा सवालही मोदींनी विचारला. मित्रांनो, तुम्ही पाहा ४ जूननंतर इंडी आघाडी एकमेकांत लढणार आहे. ४ जूननंतर हे सर्वजण एकमेकांचे कपडे फाडतील, एकमेकांचे केस ओढतील, असा टोलाही मोदींनी नांदेडमधील सभेतून लगावला.

### महादेव जानकर माझे लहान भाऊ, परभणीत नरेंद्र मोदींचं विधान; प्रचारसभेत म्हणाले

दैनिक आपला विदर्भ

**परभणी/प्रतिनिधी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी आज महाराष्ट्र दौऱ्यावर आहेत. आज त्यांनी २६ एप्रिल रोजी मतदान होत असलेल्या मतदारसंघात प्रचार सभा घेतल्या. हिंगोली, नांदेड लोकसभेच्या प्रचार सभेनंतर त्यांनी परभणी लोकसभेत प्रचार सभा घेतली. परभणीमध्ये महायुतीकडून राष्ट्रीय समाज पक्षाचे उमेदवार महादेव जानकर निवडणूक लढवत आहेत. ''महादेव जानकर हे माझे लहान भाऊ आहेत. त्यांना तुम्ही लोकसभेत पाठविणार की नाही?'', असा प्रश्न पंतप्रधान मोदींनी उपस्थितांना विचारला. तसेच मोदी यांनी आपल्या खिशातून शिटी काढून महादेव जानकर यांच्या हातात दिली. जानकर हे रासपच्या शिटी या चिन्हावर निवडणूक लढवत आहेत. >> पान ३

## शिवसंग्रामच्या नेत्या डॉ. ज्योती मेटे यांची लोकसभा निवडणुकीतून माघार

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** शिवसंग्रामच्या नेत्या डॉ. ज्योती मेटे यांनी बीड लोकसभा निवडणुकीतून माघार घेतली आहे. मी लोकसभा निवडणूक लढणार अशी भूमिका त्यांनी मुंबईतून जाहीर केली होती. बीड लोकसभा मतदाससंघातून निवडणूक लढवण्यासाठी त्या इच्छुक होत्या. मात्र आता त्यांनी माघार घेतल्याचे स्वत: म्हटले आहे.

आज बीडमध्ये पत्रकार परिषद घेऊन मी निवडणूक लढणार नाही, अशी भूमिका डॉ. ज्योती मेटे यांनी जाहीर केली आहे. ३ एप्रिल रोजी डॉ. ज्योती मेटे यांनी शरद पवारांची भेट घेतली होती. त्यामुळे महाविकास आघाडीकडून त्यांना उमेदवारी मिळणार अशी चर्चा होती. या सर्वांवर पत्रकार परिषदेत डॉ. ज्योती मेटे यांनी भाष्य केलं आहे.



शरद पवार आणि आमच्यात कुठं काय खटकलं? हे मला सांगता येणार नाही, असं डॉ. ज्योती मेटे यांनी म्हटलंय. शिवसंग्राम प्रदेश कार्यकारणीसोबत चर्चा करून लोकसभा निवडणुकीविषयी कोणासोबत जायचं? याचा निर्णय घेणार. व्यापक समाजहित लक्षात घेऊन, मतांचे विभाजन होऊ नये म्हणून निर्णय घेतल्याचे डॉक्टर ज्योती विनायकराव मेटे यांनी स्पष्ट केलं आहे.

मी बीड लोकसभेची उमेदवारी घ्यावी आणि निवडणूक लढवावी अशी जनभावना होती. त्यामुळे मी त्या दृष्टीने विचार केलाय, परंतु व्यापक समाजहित लक्षात घेऊन मी बीड लोकसभेच्या मैदानातून माघार घेत असल्याचे ज्योती मेटे यांनी स्पष्ट केले आहे. निवडणूक लढवावी असा जनतेचाच आग्रह होता. त्यामुळे मी त्या दृष्टीने चाचपणी केली तसेच उमेदवारी देखील मागितली होती. परंतु आता मी लोकसभा निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला असून पुढील भूमिका लवकरच स्पष्ट करणार असल्याचे देखील त्यांनी म्हटले आहे.

ज्योती मेटे यांच्या आजच्या पत्रकार परिषदेला मराठा क्रांती मोर्चा अन जरांगे पाटील यांचे बीडमधील सहकारी देखील उपस्थित होते. समाज म्हणून आम्ही ज्योती मेटे यांच्यासोबत आहोत, असं मराठा क्रांती मोर्चा समन्वयकांनी सांगितलं आहे.

### अकोल्यातील दिग्गज भाजप नेत्यांच्या सभा रद्द; मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या सभेचाही समावेश

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** आगामी लोकसभा निवडणुकांच्या पहिल्या टप्प्यातील मतदानाची रणधुमाळीची सांगता झालीय. पूर्व विदर्भातील पाच मतदासंघातील मतदारांचा कौल मतपेटीत बंद झाला असून अनेक दिग्गज नेत्यांचे भवितव्य आता निकालानंतर ठरणार आहे. त्यामुळे आता दुसऱ्या टप्पातील निवडणुकांच्या प्रचाराचा आधिक जोर वाढला आहे. विदर्भासह मराठवाड्यातील आठ मतदारसंघात येत्या २६ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. त्या अनुषंगाने महायुती, महाविकास आघाडी आणि इतर पक्षानी आपल्या प्रचाराचा मोर्चा त्या दिशेने वळवला आहे.

अशातच महायुतीच्या वतीने आपल्या उमेदवारच्या प्रचारार्थ महाराष्ट्रात मेगा प्लान तयार करण्यात आला आहे. मात्र आकोल्यात महायुतीकडून आयोजित करण्यात आलेल्या सभा रद्द करण्यात आल्या आहेत. यात उद्या अकोला येथे होणारी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या सभेचा देखील समावेश आहे. मात्र या सभा रद्द करण्यामागील नेमके कारण काय, हे अद्याप कळू शकलेले नाही. मात्र अचानक सभा रद्द करण्यात आल्याने भाजप आणि महायुतीच्या कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

अकोल्यातील दिग्गज भाजप नेत्यांच्या सभा रद्द

अकोल्यात महायुतीकडून भाजपचे नेते अनुप धोत्रे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. अनुप धोत्रे यांच्या प्रचारार्थ उद्या, २१ एप्रिलला अकोल्यात भव्य सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यासाठी आकोल्यातील क्रिकेट क्लब मैदानावर >> पान ३

## मनोज जरांगेंवर टीका केली नाही, केली तर शब्द मागे घेत नाही, मी गोपनाथ मुंडेंची औलाद: पंकजा मुंडे

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** राज्याचे लक्ष लागून असलेल्या बीड लोकसभा मतदारसंघात आता राजकीय वातावरण चांगलेच तापल्याचे दिसतेय. भाजप विरुद्ध राष्ट्रवादी शरद पवार अशी लढत असलेल्या बीडमध्ये आता मनोज जरांगे विरुद्ध पंकजा मुंडे यांच्या वादाची चर्चा सुरू आहे. मी मनोज जरांगे यांच्यावर टीका केली नाही, आणि जर टीका केली तर कधीच शब्द मागे घेत नाही, मी गोपीनाथ मुंडेंची औलाद आहे असे पंकजा मुंडे म्हणाल्या. गरींबांसाठी आंदोलन करणाऱ्या मनोज जरांगे यांच्यावर आपण टीका केली नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पंकजा मुंडे यांनी मराठा आरक्षणासंबंधी वक्तव्य केल्यानंतर बीडमध्ये राजकारण चांगलेच तापल्याचे दिसतंय. त्यानंतर आपण मनोज जरांगे पाटील यांच्यावर टीका केली नसल्याचे स्पष्टीकरण पंकजा मुंडे यांनी दिल आहे. गेवराई तालुक्यातल्या उमापूर येथे प्रचार सभेत पंकजा मुंडे बोलत होत्या.

मी जरांगेंवर टीका केली नाही

भाजपच्या उमेदवार पंकजा मुंडे म्हणाल्या की, वर्षभरात मी मनोज जरांगे पाटलाचं नाव देखील घेतलं नाही. मला ज्याच्यावर बोलायचं आहे मी त्याच्यावर मोठ्या आवाजात बोलते आणि मी जर टीका केली तर कधीच शब्द मागे घेत नाही, मी गोपीनाथ मुंडेंची औलाद आहे. गरिबांसाठी आंदोलन करणाऱ्या जरांगे पाटलावर मी टीका केली नाही. मला वंचितांसाठी आणि पीडितांसाठी काम



करायचं आहे, वंचित आणि पीडितांची वाली होईन अशी शपथ मी गोपीनाथ मुंडे यांच्या चितेवर घेतली होती आणि वंचितांच्या बाजूने उभे राहण्यासाठी मी कोणालाही घाबरत नसल्याचं यावेळी पंकजा मुंडे म्हणाल्या.

काय म्हणाल्या होत्या पंकजा मुंडे?

मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर बोलताना भाजप नेत्या पंकजा मुंडे म्हणाल्या होत्या की, उपोषण करून कुणाला आरक्षण मिळत नसते. त्यासाठी विधानसभा, संसदेत कायदा करावा लागतो. त्यासाठी निवडून आलेल्या लोकांना आरक्षणाचा प्रश्न सोडवता येतो. उपोषण केल्याने त्याचा काही फायदा होत नाही.

माझ्या वाट्याला जाऊ नका

पंकजा मुंडे यांनी केलेल्या या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना मनोज जरांगे म्हणाले की, पंकजा मुंडे काय म्हणाल्या हे मला माहिती नाही. पण मी त्यांच्या वाट्याला गेलो नाही, त्यांनीही माझ्या वाट्याला जाऊ नये.

बीडमध्ये भाजपकडून पंकजा मुंडे लोकसभेच्या रिंगणात आहेत, तर त्यांच्या विरोधात राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाकडून बजरंग सोनवणे हे उभे आहेत.

## अग्रलेख

### अहिंसेचे प्रतीक भगवान महावीर

जैन धर्माचे चोविसावे तीर्थांकर अहिंसेचे मूर्तिमंत प्रतीक भगवान महावीर यांची आज जयंती. भगवान महावीर यांचा जन्म वैशाली राज्याच्या कुंडलपूर येथे इसवी सन पूर्व ५९९ मध्ये झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सिद्धार्थ तर आईचे नाव त्रिशला असे होते. त्यांच्या भावाचे नाव नंदिवर्धन तर बहिणीचे नाव सुदर्शना असे होते. त्यांचे बालपण राजेशाही थाटात गेले. भगवान महावीर आठ वर्षाचे असताना त्यांना शिक्षण आणि शस्त्र विद्येचे प्रशिक्षण घेण्यासाठी शाळेत पाठवण्यात आले. भगवान महावीरांचे कुटुंब जैनांचे तेविसावे तीर्थांकार भगवान पार्श्र्वनाथ यांचे अनुयायी होते. भगवान महावीर २८ वर्षाचे असतानाच त्यांच्या आईवडीलांचे निधन झाले त्यानंतर त्यांनी श्रामणी दीक्षा घेतली आहे. त्यानंतर काही दिवसांनी त्यांना आत्मज्ञान प्राप्त झाले. त्यांनी १२ वर्ष मौन पाळले. हटयोग्याप्रमाणे त्यांनी शरीराला कष्ट दिले. ज्ञानप्राप्तीनंतर त्यांनी जनकल्याणासाठी उपदेश देण्यास सुरुवात केली त्यासाठी त्यांनी त्याकाळी प्रचलित असणारी अर्धमागधी भाषेचा आधार घेतला. इंद्रिय व विषय वासनेचे सुख दुसऱ्याला दुःख देऊनच मिळवता येते असे त्यांचे मत होते त्यामुळेच त्यांनी जैन धर्माच्या अहिंसा, सत्य, अस्तेय, अपरिग्रह याबाबींमध्ये ब्राम्हचर्याचाही समावेश केला. त्याग संयम, प्रेम, करुणा, शील व सदाचार हे त्यांच्या प्रवचनाचे सार होते. त्यांनी चतुर्वेध संघाची स्थापना करुन समता हेच जीवनाचे लक्ष असल्याचे सांगितले. देशात ठिकठिकाणी फिरून भगवान महावीरांनी या पवित्र संदेशाचा प्रसार केला. इसवी सन पूर्व ५२७ मध्ये बिहार मधील पावापुरी येथे वयाच्या ७२ व्या वर्षी त्यांचे निर्वाण झाले. तो दिवस होता कार्तिक कृष्ण अमावस्येचा. भगवान महावीरांच्या जन्म आणि निर्वाण दिनादिवशी घराघरात दिवे लावले जातात. भगवान महावीर म्हणतात की, जाणते किंवा अजाणतेपणातून कोणाची हिंसा करणे योग्य नाही. याशिवाय दुसऱ्याच्या मार्फतही कोणाची हिंसा घडवून आणू नये कुठल्याही जीवांना मन, शरीर किंवा बोलण्याने दंडित करू नये. सर्वांच्या आत एकच आत्मा आहे. आपल्या प्रमाणेच प्रत्येक प्राण्यांना आपापले प्राण प्रिय आहे त्यामुळेच कोणत्याही प्राण्यांप्रति हिंसा करू नये. स्वतः हिंसा करणारा, दुसऱ्यांकडून हिंसा घडवून आणणारा व दुसऱ्याने केलेल्या हिंसेचे समर्थन करणारा स्वतःप्रति द्वेष वाढवत असतो असे तेच मत होते. कोणत्याही प्रकारची हिंसा न करणे हीच ज्ञानाची खरी परिभाषा आहे. अशाप्रकारे त्यांनी ज्ञानाची व्याख्या केली आहे. आपल्या आत्म्याविषयी असणारा भाव इतर प्राण्यांविषयी असू द्या. सर्व प्राणिमात्रांविषयी अहिंसेचा भाव राखा मन, वाणी आणि शरीराने कोणाचीही हिंसा न करणारा खरा संयमी म्हणून गणला जातो अशी संयमी माणसाची व्याख्या त्यांनी केली. चालताना, बसताना, बोलताना, जेवण करताना असावध असणारा, स्वतःची पूर्ण खात्री झाल्याशिवाय, पहिल्या व विचार केल्याशिवाय कृती करणारा हिंसा करत असतो असे त्यांचे मत होते. दुःखास सर्वच जीव घाबरत असतात हे लक्षात घेऊन कोणत्याही जीवास कष्ट पोहचवणे टाळावे असे ते आपल्या प्रवचनात नेहमी सांगत.

# Arranged Marriage करण्याआधी 'या' ५ गोष्टींचा नक्की विचार करा, नाहीतर पश्चाताप अटळ



लग्नासाठीच्या वयात आल्यानंतर कुटुंबीयांची एकच भुणभूण सुरु होते आणि पाहता पाहता स्थळे बघण्यालाही सुरुवात होते. डेंीश चरीीळरसश करणाऱ्यांना या गोष्टींचे दडपण नसते. पण, विवाह प्रस्ताव स्वीकारत, वधु वर सूचक किंवा एखाद्या ओळखीतल्यांनी सुचवलेल्या स्थळाशी अर्थात व्यक्तीशी लग्न करणं मात्र फार कठीण आणि तितकंच आव्हानात्मक ठरते.

अीरपसशव चरीीळरसश विवाहपद्धतीमध्ये अनेकदा काही अशी वळणं येतात जेव्हा आपण लग्न केलेय तर खरे पण हा निर्णय योग्य होता का? असा अतिशय गंभीर प्रश्न उभा राहतो. त्यामुळे अीरपसशव चरीीळरसश करण्यापूर्वी काही गोष्टी लक्षात घेणे आणि त्यांचा पूर्ण विचार करणं कधीही उत्तम पर्याय.

'परफेक्ट मॅच' म्हणून तुम्ही ज्या व्यक्तीचा विचार करत आहात त्याआधी तुम्ही नात्यातून काय अपेक्षा ठेवता याचा पूर्ण करा. तुम्हाला तुमच्या नात्यात काय हवं हे माहित असणे खूप गरजेचे आहे. जर ते माहित नसेल तर कदाचित तुमचा अीरपसशव चरीीळरसश गोंधळ होऊ शकतो. हाच गोंधळ टाळण्यासाठी काही गोष्टी नक्की ध्यानात ठेवा.

१. वेळमर्यादा ठरवा

अरेंज मॅरेज करताना तुम्ही स्वत:साठी एक वेळ निश्चित केल्याने तुम्हाला पुढील गोष्टींसाठी स्पष्टता मिळते. तुम्ही तुमच्या पार्टनरची निवड मॅट्रीमोनिअल साईट वरुन किंवा नातेवाईकांनी केली असल्यास त्या व्यक्तीसोबत किती वेळ घालवावा याचे गणित तुमच्याजवळ असणे गरजेचे आहे. अशा वेळेस तुमची घाई होत नाही आणि लग्नाआधी त्या व्यक्तीसोबत घालवण्यासाठी पुरेसा वेळ मिळतो. जमल्यास या वेळेत तुम्ही एकमेकांना वेळ द्या, आवडी-निवडी, सवयी आणि इतर महत्त्वाच्या गोष्टी आपाआपसात शेअर करा. हा पहिला टप्पा अरेंज मॅरेज करणाऱ्यांसाठी खूप महत्त्वाचा असतो.

२. त्याच्या किंवा तिच्या कुटुंबासमवेत वेळ व्यतीत करा

ज्या व्यक्तीसोबत तुम्ही लग्न करणार आहात त्या व्यक्तीच्या कुटुंबासोबत काही महत्त्वाचे क्षण घालवा. अशाने त्याच्या घरातील परंपरा रिती, प्रथा परंपरा याविषयी माहित मिळते. कुटुंबासोबत वेळ घालवल्याने तुम्हाला त्यांच्या आवडीनिवडींची कल्पना येते. पुढे तुम्हाला त्या परिवारतील मंडळीना समजणे फार कठीण जात नाही.

३. आर्थिक समतोल

लग्नानंतर दोघांनी कमवते असणे फार महत्त्वाचे आहे. जर तुम्ही दोघेही नोकरी करताय, किंवा अर्थार्जनाचे दोन मार्ग आहेत तर, अशा वेळी कोणा एकावर भार येत नाही. तुम्ही अरेंज मॅरेज करा किंवा लव्ह मॅरेज आर्थिक स्वांतत्र्य असणे फार गरजेचे आहे. तुम्ही समोरच्या व्यक्तीवर अवलंबून राहिल्यास त्याचा तुम्हाला भविष्यात त्रास जाणवेल. त्यामुळे अरेंज मॅरेज करण्याआधी आर्थिक गणिते न लाजता स्पष्टपणे बोलून घ्या.

४. मनात काही ठेवू नका...

तुम्ही जेव्हा रिलेशनमध्ये असता तेव्हा तुम्हाला तुमच्या प्रियकराविषयी सगळ्याच गोष्टी माहित असतात, पण जेव्हा श्रशसलपशी अीरपसशव चरीीळरसश करता तेव्हा तुम्हाला त्या व्यक्तीविषयी काहीच माहित नसते. मग अशा वेळेस तुम्ही त्या व्यक्तीचा तुमच्या आयुष्यात कशाप्रकारे विचार करता, तुम्हाला काय अपेक्षित आहे या सगळ्या गोष्टी न विचार करता त्या व्यक्तीला सांगा जेणेकरुन विवाहबधंनात अडकण्याआधी तुम्हाला चांगलीच स्पष्टता मिळते.

५. भूतकाळाविषयी जोडीदाराला कल्पना असूद्या

आपण अनेकदा लग्नाच्या वेळी समोरील व्यक्तीपासून भूतकाळ लपवतो. पण काही वेळाने तो भूतकाळ काही कारणाने समोर आल्याने नवीन वादाला आणि गैरसमजांना तोंड फुटतं. अशावेळेस शक्य तितक्या किंवा गरजेचे काही भूतकाळातील अनुभव तुमच्या होणाऱ्या पार्टनरला सांगावेत. जेणेकरुन काही गोष्टींचा अंदाज घेणे सोपे होते. अशाने तुमचे नाते अधिक मजबूत व्हायला मदत होते.

या ५ गोष्टींमुळे तुम्हाला अरेंज मॅरेज करताना फारशा अडचणी येत नाही. लग्नासाठी होकार देण्याआधी या ५ गोष्टींचा विचार केल्यास तुम्हाला महत्त्वाच्या स्पष्टता मिळतात.

# फॅटी लिव्हरच्या या ३ लक्षणांकडे करू नका दुर्लक्ष, होऊ शकते यकृत निकामी

गेल्या दशकात लोकांच्या खाण्याच्या सवयींमध्ये खूप बदल झाला आहे. फास्ट फूडचा ट्रेंड वाढला आहे. या चुकीच्या खाण्याच्या सवयींमुळे यकृत खराब होत आहे. त्यामुळे फॅटी लिव्हरचे आजार फोफावत आहेत. भारतात दरवर्षी या आजाराची आकडेवारी वाढत आहे. शहरी भागात तर परिस्थिती बिकट आहे. विशेष म्हणजे २० ते ३० या वयोगटातही फॅटी लिव्हरची प्रकरणे समोर येत आहेत. फॅटी लिव्हरची समस्या ओळखून त्यावर वेळीच उपचार न केल्यास यकृत निकामी होऊ शकते. जे घातक आहे. अशा परिस्थितीत फॅटी लिव्हरची सुरुवातीची लक्षणे जाणून घेणे अत्यंत आवश्यक आहे. डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार, यकृतातील कोणत्याही बिघाडाची लक्षणे सुरुवातीलाच दिसू लागतात. परंतु बहुतेक लोक त्यांच्याकडे दुर्लक्ष करतात.

फॅटी लिव्हरची अनेक कारणे आहेत. यामध्ये खाण्याच्या चुकीच्या सवयी, दारूचे सेवन, वाढता लठ्ठपणा ही तीन प्रमुख कारणे आहेत. याशिवाय, अनेक प्रकरणांमध्ये, हिपॅटायटीस बी संसर्ग आणि अनुवांशिक कारणांमुळे यकृतावर परिणाम होऊ शकतो. फॅटी लिव्हरच्या बाबतीत यकृत निकामी होऊ नये म्हणून या आजाराची लक्षणे जाणून घेणे आवश्यक आहे.

लहान वयातही होतो हा आजार

याबाबत तज्ज्ञ सांगतात की फॅटी लिव्हरची समस्या महामारीचे रूप धारण करत असल्याचे दिसते. पूर्वी हा आजार वयाच्या ५० वर्षांनंतर दिसून येत होता, पण आता ३० वर्षांपेक्षा कमी वयाच्या रुग्णांमध्ये वाढ होऊ लागली आहे. आरामदायी जीवनशैली आणि खाण्याच्या चुकीच्या सवयी हे याचे कारण आहे.

कोणती आहेत फॅटी लिव्हरची ३ धोकादायक लक्षणे

दररोज पोटदुखी

डॉक्टर सांगतात की पोटदुखीची समस्या हे फॅटी लिव्हरचे प्रमुख लक्षण आहे, ज्याकडे बहुतेक लोक दुर्लक्ष करतात. अशा परिस्थितीत एखाद्याला पोटदुखीचा त्रास होत असेल तर डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. ही समस्या हलक्यात घेऊ नये. उशीर झालेला उपचार प्राणघातक ठरू शकतो.

त्वचा पिवळसर होणे

त्वचेचा पिवळसरपणा यकृताचा गंभीर आजार दर्शवतो. तुमचे डोळे पिवळे पडत असतील किंवा नखे ??पिवळी पडत असतील, तर लगेच उपचार करा.

भूक न लागणे आणि अपचन

भूक न लागणे आणि अपचन हे यकृत योग्यरित्या कार्य करत नसल्याची लक्षणे आहेत. हे फॅटी लिव्हरचे मोठे लक्षण आहे. अपचनाचा त्रास आणि दीर्घकाळ भूक न लागण्याची समस्या असल्यास तपासून घ्या.

# मासिक पाळी दरम्यान व्यायाम करणे स्त्रियांसाठी किती आहे फायदेशीर? जाणून घ्या तज्ञांकडून

व्यायाम करणे आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. यामुळे अनेक प्रकारचे आजार टाळता येतात. डॉक्टर दिवसातून किमान १५ मिनिटे व्यायाम करण्याचा सल्ला देतात. पण मासिक पाळीदरम्यान हलका वर्कआऊट करता येऊ शकतो, असे डॉक्टरांचे म्हणणे असले तरी मासिक पाळीदरम्यान व्यायाम करणे महिला टाळतात. जर स्त्रीला कोणतीही समस्या नसेल





आणि गंभीर आजाराची समस्या नसेल, तर ती व्यायाम करू शकते. याचा फक्त शरीराला फायदा होतो. पीरियड दरम्यान महिला कोणत्या प्रकारचे वर्कआउट करू शकतात आणि त्यांचे काय फायदे आहेत हे जाणून घेऊया तज्ञांकडून.

याबाबत स्त्रीरोगतज्ञ सांगतात की मासिक पाळी दरम्यान व्यायाम करता येतो, पण तो खूप कमी तीव्रतेचा असावा. मासिक पाळी दरम्यान दररोज व्यायाम करणे देखील आवश्यक नाही. यादरम्यान एक दिवस योगासनेही करता येतात. यामुळे मासिक पाळीच्या दरम्यान पेटके आणि सूज येण्यापासून आराम मिळू शकतो.

स्त्रीरोगतज्ञ सांगतात की, पीरियडच्या काळात शरीरात अनेक प्रकारचे बदलही जाणवतात, जे व्यायामाने कमी करता येतात. व्यायाम केल्याने शरीरात फील-गुड हार्मोन्सची पातळी वाढते. यामुळे मूड चांगला राहतो आणि मानसिक ताणही कमी होतो.

मात्र, या काळात फक्त तेच व्यायाम करावेत जे तुम्ही आरामात करू शकता. मासिक पाळीच्या पहिल्या दिवशी हे टाळावे. कारण या दिवशी भारी फळ असते. अशा परिस्थितीत वर्कआउट करणे योग्य नाही.

हा एक सोपा व्यायाम आहे ज्यामध्ये कोणतीही विशेष समस्या नाही. हे घरी किंवा बाहेर कुठेही करता येते. हळू चालत जा आणि किमान १० ते १५ मिनिटे चालावे. यासोबतच हलका एरोबिक व्यायाम ही करता येतो, मात्र पीरियडमध्ये पोटात तीव्र वेदना होत असतील तर व्यायाम टाळावा. या प्रकरणात डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

मासिक पाळीत बराच वेळ व्यायाम करू नका. अर्ध्या तासात तुमचा व्यायाम पूर्ण करा. दीर्घकाळ असे करणे हानीकारक ठरु शकते. कोणताही आजार असला तरी डॉक्टरांच्या सल्ल्यानुसारच व्यायाम करा. स्वत:हून कधीही भारी कसरत करू नका. असे करणे हानिकारक ठरू शकते.

## आयुर्वेदात वर्णिलेल्या केसांकरीता हितकर वनस्पती !

आजकाल शॅम्पू तेल कंडिशनर जेल यांचा इतका सुळसुळाट आहे. प्रत्येक कंपनी आपले प्रोडक्ट कसे चांगले याची जाहिरात करीत असते. सोशल मिडीयावरदेखील अनेक तेल शॅम्पूच्या जाहिराती वाचायला मिळत असतात. आयुर्वेदात केसांच्या समस्यावर आभ्यंतर व बाह्य चिकित्सा सांगितली आहेत. केशाय हितं केश्यं म्हणजेच केसांना हितकर द्रव्यांचा उल्लेख आहे. यात मुख्यतः केशवर्धन करणारे वनस्पती आणि केशरंजन करणारी वनस्पती आहेत. केस गळणे ही समस्या योग्य केसांचे पोषण होत नसल्याने उद्भवते. केसांची मुळे हलकी झाल्याने केस गळायला लागतात. अशावेळी केशवर्धन करणारी वनस्पतींचा उपयोग होतो. दूधी, खोबरेल तेल केसांच्या मुळांना चोळून जिरविणे फायदेशीर ठरते. आवळा, गुळवेल सारख्या वनस्पती केशवर्धनाचे कार्य करतात. अकाली केस पांढरे होत असल्यास केशरंजन करणारी द्रव्ये उपयोगी ठरतात.

माका - भृंगराज तेल तसे प्रसिद्धच आहे. भृंगराज या वनस्पतीचे पर्यायी नावच केशरंजन, केश्य असे आहे यावरून केसांकरीता किती उपयोगी आहे हे लक्षात येते. उत्तम रसायन उत्तम केश्य वनस्पती भृंगराज आहे.

जास्वंद - केस गळणे, अकाली केस पांढरे होणे, चाई पडणे या विकारांवर जास्वंद तेल, लेप या रुपात लाभदायक आहे. केसांचे विकार दूर करणारे जास्वंद उत्तम केश्य वनस्पती आहे.

नलिनी, आवळा, बिभितक, तिळ, गुंजा अशा अनेक वनस्पती केश्य म्हणजेच केसांकरीता हितकारी सांगितल्या आहेत. प्रकृति, वय, व्याधी कारणांचा विचार करून या वनस्पतींचा उपयोग वैद्य करीत असतात.

केस विकाराची कारणे शोधून त्यानुसार द्रव्य उपाययोजना करता येते. आयुर्वेदाची सौंदर्य शास्त्राला मिळालेली ही मोठी देणगीच आहे.

## कायम सुखी राहण्याचा सर्वात सोपा पण तेवढाच सिक्रेट फंडा

जग तुमच्यासोबत कसं वागते हा नंतरचा प्रश्न आहे. तुम्ही स्वत:सोबत कसं वागता यावर सगळं अवलंबून आहे. तुमच्या आवडीनिवडी, भविष्यातील प्लान, किंवा कोणत्या गोष्टी टाळल्या पाहिजे, या सगळ्या गोष्टींचा विचार निवांत वेळेत झाला पाहिजे. त्यामुळे स्वत:सोबत वेळ घालवा, स्वत:ला समजून घ्या. त्यासाठी तुम्हाला अतिरिक्त पैसे खर्च करायची गरज नाही. आम्ही तुम्हाला स्वत:सोबत डेट करण्याच्या ३ टिप्स सांगणार आहोत. जेणेकरुन तुम्हला स्वत:ला आनंदी ठेवण्यास मदत होईल...

१. स्वत:ची कंपनी, बेस्ट कंपनी

एकेदिवशी तुम्ही सकाळी लवकर उठून पुर्ण दिवसाचं प्लॅनिंग करा. पण त्यादिवशी स्वत:सोबत एक निश्चय करा, तो दिवस फक्त स्वत:सोबत घालवाल. छान तयार व्हा. उदाहरणार्थ एखादा छान चित्रपट पाहायला जा, दुपारचे जेवण तुमच्या आवडीप्रमाणे बाहेर करा. संध्याकाळी एखाद्या कॅफेत जाऊन कॉफी घ्या. स्टॅंडप कॉमेडी किंवा स्टोरीटेलिंग सारखे लाईव्ह शो पाहा. उरलेली संध्याकाळ समुद्र किनारी बसून सूर्यास्त पाहा. हे सगळं करताना तुम्ही एकटे असाल याची काळजी घ्या. कारण आपण नेहमीच प्रत्येकासोबत वेळ घालवत असतो. पण स्वत:सोबत क्वचित वेळ घालवतो. अशा पद्धतीने जर स्वत:सोबत तुम्ही वेळ घालवला तर तो क्षण अविस्मरणीय असेल असा अनुभव नक्कीच तुम्हाला येईल.

२. स्वत:ला ओळखा

संध्याकाळचा कॉफी किंवा चहा घेत स्वत:सोबत वेळ घालवा. अशावेळेस असे काही प्रश्न विचारा ज्यातून जाताना तुम्हाला त्रास जाणवत आहे. स्वत:शी बोला, जोपर्यंत उत्तरं मिळत नाही तोपर्यंत स्वत:ला प्रश्न विचारा. प्रश्न विचारताना स्वत:ला त्रास करुन घेऊ नका. पण प्रश्न विचारा. आतापर्यंत तुम्ही कुठे चुकत होता, चुकत आहात, याचा विचार करा. नवीन काय शिकण्याची गरज आहे. कोणत्या गोष्टीत जास्त वेळ घालवला पाहिजे, कुठे वेळ घालवला नाही पाहिजे याचा विचार करणे खूप गरजेचे आहे. अशावेळेस तुम्हाला तुमच्या प्रश्नांची उत्तरे मिळतील. तुम्हाला काय आवडते काय नाही आवडत याचा विचार करा. कोणत्या गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजे आणि कोणत्या गोष्टींचा विसर पडला पाहिजे हे देखील त्यात आले पाहिजे. एखाद्या वहीत तुम्हाला सापडलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहून ठेवा. जेव्हा ही चुकल्यासारखे वाटेल तेव्हा ती वही उघडुन कुठे चुकत आहात याचा शोध घ्या.

३. स्वत:च्या पाठीवर शाबासकी द्या -

आपल्यं आयुष्य हे क्रिकेट मॅच नाही आहे. आपल्या आयुष्यातला हिरो आणि प्रेक्षक आपणच असतो. त्यामुळे आपल्यासाठी कोणी टाळ्या वाजवतील याची अपेक्षा करु नका. स्वत:ला मोटीवेट करण्यासाठी टाळ्या वाजवा आणि जर कुठे चुकत असाल तर जाब ही विचारा. आतापर्यंत घेतलेल्या मेहनतीसाठी स्वत:ची पाठ थोपटा. शक्य असल्यास स्वत:चे दररोज कौतूक करा अशाने तुम्ही प्रेरित व्हाल.

DAINIK AAPLA VIDHARBH -Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301(Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर-जि.बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि.बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक-रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.97672 33034 पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत. (टिप:-प्रकाशित झालेल्या जाहिरातीची जबाबदारी प्रकाशकाची नाही.)




# मतदानासाठी १२ ओळखीचे पुरावे ग्राह्य

## कोणताही एक पुरावा दाखवून मतदान करत येणार

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : येत्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये दि. २६ एप्रिल रोजी मतदान करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने ईपीक म्हणजेच मतदार फोटो ओळखपत्र आणि इतर १२ ओळखीचे पुरावे ग्राह्य धरले आहेत. यापैकी कोणताही एक ओळखीचा पुरावा मतदार केंद्रावरील अधिकाऱ्यांना दाखविल्यानंतर मतदारांना मतदान करता येणार आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करीता छायाचित्रासह मतदार ओळखपत्र म्हणजेच ईपीक देण्यात आले आहे. ते मतदार मतदानकेंद्रावर त्यांची ओळख पटविण्यासाठी छायाचित्रासह मतदार ओळखपत्र सादर करतील. परंतू मतदारांकडे छायाचित्रासह मतदार ओळखपत्र नसल्यास अशा मतदारांना त्यांची ओळख पटविण्यासाठी मतदार ओळखपत्राच्या व्यतिरिक्त इतर १२ पुराव्यापैकी कोणताही एक पुरावा ग्राह्य धरण्यात येणार आहेत.

मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी स्वत:ची ओळख पटविण्यासाठी पुराव्यांमध्ये आधारकार्ड, मनरेगा जॉब कार्ड, बँक किंवा पोस्ट ऑफिसने जारी केलेले छायाचित्र असलेले पासबुक, कामगार मंत्रालयाच्या योजनेंतर्गत जारी केलेले आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, वाहन चालक परवाना, पॅन कार्ड, रजिस्टार जनरल ऑफ इंडिया यांच्याद्वारा नॅशनल पॉप्युलेशन रजिस्टर अंतर्गत निर्गमित स्मार्ट कार्ड, भारतीय पासपोर्ट, छायाचित्रासह पेन्शन दस्तऐवज, केंद्र, राज्य सरकार, सार्वजनिक उपक्रम, पब्लिक लिमिटेड कंपनी यांनी कर्मचाऱ्यांना जारी केलेले सेवा ओळखपत्र, खासदार, आमदारांना जारी करण्यात आलेले अधिकृत



ओळखपत्र, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तीकरण मंत्रालयाने जारी केलेले विशेष विकलांगता प्रमाणपत्र असे १२ कागदपत्रे पुरावा म्हणून ग्राह्य धरण्यात येणार आहेत.

मतदारांना छायाचित्रासह मतदार ओळखपत्र देण्यात आलेले आहेत, ते मतदान मतदान केंद्रावर त्यांची ओळख पटविण्यासाठी छायाचित्रासह मतदार ओळखपत्र सादर करतील. ईपीक सादर करणे शक्य नसल्यास इतर १२ प्रकारच्या ओळखपत्रापैकी कोणतेही एक ओळखपत्राचा उपयोग करून मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

पान १ वरून...

### महादेव जानकर माझे लहान भाऊ

त्यामुळे मोदींनी ही प्रतिकात्मक भेट त्यांना दिली. यानंतर जानकर यांनी मंचावरच ही शिटी फुंकली. पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या भाषणात म्हणाले की, आमच्या सरकारच्या धोरणांमुळे परभणीतील १२ लाख लोकांना मोफत रेशन मिळत आहे. या कुटुंबातील कुणालाही उपाशी झोपावं लागत नाही. पुढील पाच वर्षातही असेच मोफत रेशन मिळत राहिल. तसेच परभणीत १७ जनऔषधी केंद्रातून औषधांवर ८० टक्के सूट मिळत आहेत. सव्वा लाखाहून अधिक महिलांना उज्वला गॅस जोडणी देण्यात आली आहे. परभणीत ७५ टक्क्यांहून अधिक घरातून नळाद्वारे पाणी देण्यात येत आहे.

परभणीतील नऊ लाखाहून अधिक जनावरांचे मोफत लसीकरण करण्यात आले आहे. कोणतेही सरकार हे काम तेव्हाच करू शकते, जेव्हा ते गरीबांप्रती संवेदनशील असते.

काँग्रेसने निजामाप्रमाणेच मराठवाड्याचा विकास होऊ दिला नाही

''काँग्रेस अशी वेल आहे, ज्याचे स्वत:चे मूळ आणि जम ीन नाही. या वेलीला जो आधार देतो, त्यालाच ती संपवते. त्यांनी स्वातंर्त्यप्राप्तीनंतर देशाची फाळणी केली, काश्मीरचा प्रश्न पेटवला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान जम्मू आणि काश्मीरमध्ये लागू होऊ दिले नाही. तिथल्या दलितांना इतके वर्ष अधिकारच मिळू दिले नाही. महाराष्ट्रातही काँग्रेसचे सरकार असताना मराठवाड्यातून निजामांचे राज्य केले आहे, याची जाणीवच त्यांनी करू दिली नाही. निजामासारखीच मानसिकता ठेवून त्यांनी मराठवाड्याचा विकास होऊ दिला नाही'', अशी टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली.

रझाकारांची मानसिकता असलेल्या लोकांना मराठवड्यात स्थान देऊ नका, असेही आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.

### अकोल्यातील दिग्गज भाजप

या सभेची जय्यत तयारी करण्यात आली होती. या सभेला प्रामुख्याने उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री आणि भाजपचे स्टार प्रचारक योगी आदित्यनाथ हे उपस्थित राहणार होते. मात्र उद्या होणारी ही सभा अचानक रद्द करण्यात आल्याची माहिती पुढे आली आहे. यासोबतच आज दुपारी ४ वाजता मुर्तिजापूर येथे होणारी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सभा सुद्धा रद्द करण्यात आली आहे.अनुप धोत्रे यांच्या अर्ज दाखल करण्याच्या दिवशी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि इतर भाजपचे नेते उपस्थित झाले होते. त्यानंतर भाजपच्या सभेसाठी कोणताही मोठा नेता अकोला मतदारसंघात आला नाही. अशातच पूर्व नियोजित नेत्यांच्या सभा रद्द झाल्याने कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाल्याची प्रतिक्रिया उमटताना दिसत आहे. तर दुसरीकडे या सभा रद्द होण्यामागील नेमकं कारण काय, हे अद्याप कळू शकलेले नाही.

अकोला लोकसभेत तिरंगी लढत

अकोला लोकसभा मतदारसंघात काँग्रेसने निष्णात ऑर्थोपेडिक सर्जन असलेल्या अभय पाटील यांना उमेदवारी जाहीर केली आहे. तर वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा प्रकाश आंबेडकर हे वंचितकडून निवडणुकीच्या रिंगणात आहेत. महायुतीकडून भाजपचे अनुप धोत्रे यांना उमेदवारी देण्यात आली असल्याने अकोला लोकसभेत तिरंगी लढत होणार आहे. या मतदारसंघात प्रकाश आंबेडकर यांची मोठी ताकद आहे. याच कारणामुळे त्यांनी या जागेवरून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. दुसरीकडे काँग्रेसनेही डॉ. अभय पाटील यांना तिकीट दिले आहे. मात्र ओपीनियन पोलनुसार येथे चुरशीची लढत होण्याची शक्यता असली तरी तेथे भाजपाचेच धोत्रे बाजी मारतील असा अंदाज व्यक्त केला जातोय.

### समलिंगी पतीकडून छळ;

तुझ्यामुळे माझ्या मुलाचे आयुष्य बरबाद झाले आहे. तुझ्यापेक्षा चांगली सून आम्हाला मिळाली असती, असे टोमणे सासू आणि नणंदेने मारले. टोमणे आणि मारहाणीमुळे महिला माहेरी नुकतीच निघून आली. पती समलैंगिक असल्याची बाब लपवून ठेवण्यात आली, तसेच किरकोळ कारणावरुन मारहाण करण्यात आली, असे महिलेने फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस उपनिरीक्षक मगदूम तपास करत आहेत.

# काँग्रेस नेत्याच्या 23 वर्षीय मुलीची हत्या, लव्ह जिहादच्या आरोपांनी राजकारण तापले

बेळगाव,: कर्नाटकात हुबळी धारवाड महापालिकेचे नगरसेवक निरंजन हिरेमठ यांची मुलगी ेहा हिची तिच्याच क्लासमध्ये शिकणाऱ्या फयाज नावाच्या मुलाने चाकूने भोसकून हत्या केली. या हत्या प्रकरणानंतर नेहाचे वडील निरंजन हिरेमठ यांनी ही हत्या लव्ह जिहाद असल्याचे म्हटलेय. निरंजन हिरेमठ यांनी म्हटले की, मी मागणी करतो की इतर लोकांना सुद्धा या प्रकरणामध्ये अटक व्हावी. हे लव्ह जिहाद नाही तर काय आहे? लव्ह जिहादसाठी ते चांगल्या घरातील मुलींना टार्गेट करता. त्यांचा एन्काउंटर करायला पाहिजे किंवा फाशी द्यायला हवी.

निरंजन हिरेमठ यांची मुलगी नेहा हिची चाकूने भोसकून हत्या करण्यात आली. कॉलेज परिसरातच तिच्यावर कॉलेज ड्रॉपआउट स्टुडंट फय्याज खोंडुनाईक याने चाकू हल्ला केला. पोटासह शरीरावर चाकूने ७ वार करण्यात आले. यात तिचा मृत्यू झाला. नेहाचे वडील निरंजन हिरेमठ यांनी केलेल्या आरोपानंतर भाजपनेसुद्धा लव्ह जिहादवरून आरोप केला.

काँग्रेसचे धोरण जिहादींना पोषक – भाजप

कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री जगदीश शेट्टर यांनी आरोप केला की, काँग्रेस सरकारचे जिहादींना पोषक वातावरण तयार करणारे धोरण आहे. हुबळी कॉलेजमध्ये नेहाची हत्या ही बिघडलेल्या सुरक्षा व्यवस्थेचं उदाहरण आहे. आरोपींना अटक करणे पुरेसे नसून भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी ठोस पावले उचलायला हवीत.

हा लव्ह जिहाद नाही – सिद्धरामय्या

दरम्यान, कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी हा प्रकार लव्ह जिहाद नसल्याचं म्हटलंय. लव्ह जिहादचं हे प्रकरण नाही. मी या घटनेचा निषेध करतो. तसंच आरोपीला अटक केली असून पुढील तपास सुरू आहे. आम्ही गुन्हेगाराला कठोर शिक्षा देऊ. कायदा आणि सुव्यवस्था राखली जावी यासाठी प्रयत्न केले जातील.

काय घडले होते?

नेहा आणि फयाज यांची कॉलेजमध्ये ओळख झाली होती. फयाजने नेहाला प्रपोज केले पण नेहाने ते स्वीकारले नव्हते. त्यानंतर नापास झालेला फयाज सहा महिन्यांपासून कॉलेजला आला नव्हता. मात्र नेहाने नकार दिल्याच्या रागातून त्याने कॉलेज परिसरात तिचा पाठलाग करून हल्ला केला. या हल्ल्यात नेहा गंभीर जखमी झाली आणि तिचा मृत्यू झाला. ही घटना कॉलेज परिसरात लावलेल्या सीसीटीव्हीमध्येही कैद झाली आहे.

# धक्कादायक! ५८ वर्षीय आजोबाकडून नातीवर तब्बल १० वर्षे अत्याचार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : आजोबा आणि नातीच्या नात्याला काळीमा फासणारी संतापजनक घटना मुंबईतल्या मालाड परिसरात समोर आली आहे. या ५८ वर्षीय नराधम आजोबाने त्याच्याच नातीवर अत्याचार केल्याचा घृणास्पद प्रकार पीडित मुलगी सज्ञान झाल्यावर तब्बल १० वर्षांने उघडकीस आला आहे. या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. मालाडच्या कुरार पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कुरार येथे रहाणाऱ्या एका नराधम सावत्र आजोबाने २०१४ मध्ये घरात कोणी नसल्याची संधी साधून खेळण्याबागडण्याच्या वयात असलेल्या १० वर्षाच्या चिमुकलीवर अत्याचार केला. या अत्याचाराची बाहेर वाच्यता केल्यास जीवे मारण्याची धमकी या आजोबाने नातीला दिली होती. त्यामुळे घाबरलेली ही पीडित मुलगी गेली अनेक वर्षे हा अत्याचार निमुटपणे सहन करत होती.पीडित मुलगी आता सज्ञान झाली असून या १९ वर्षीय नातीने आपल्यावर होत असलेल्या अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी कुरार पोलीस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांनीही या धक्कादायक घटनेची दखल गांभीर्याने घेतली आहे. या घटनेची रितसर तक्रार नोंद करुन पोलिसांनी ५८ वर्षीय आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत.या आजोबा विरोधात बलात्कार आणि पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला असून कुरार पोलीस अधिक चौकशी करत आहेत.

# दादर रेल्वे स्थानकावर लॉरेन्स बिष्णोई टोळीचा गुंड, पोलीस मुख्य नियंत्रण कक्षाला दूरध्वनी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : अभिनेता सलमान खानच्या घरावर झालेल्या गोळीबाराची घटना ताजी असतानाच आता दादर रेल्वे स्थानाकावर कुख्यात लॉरेन्स बिष्णोई टोळीतील गुंड येणार असल्याचा दूरध्वनी मुंबई पोलिसांना आला. त्यामुळे पोलिसांची धावपळ उडाली. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत. मुंबई पोलिसांच्या मुख्य नियंत्रण कक्षाच्या शुक्रवारी मध्यरात्री एक अनोळखी व्यक्तीने दूरध्वनी केला होता. लॉरेन्स बिष्णोई टोळीचा गुंड दादर रेल्वे स्थानकात सकाळी १० वाजता येणार असून त्याने लाल रंगाचा शर्ट परिधान केलेला असेल, असे दूरध्वनी करणाऱ्या व्यक्तीने सांगितले. तसेच मुंबईत तो घातपात करणार असल्याचेही त्याने सांगितले. हे बोलून त्याने तात्काळ दूरध्वनी बंद केला. त्यानंतर पोलिसांनी पुन्हा त्याला दूरध्वनी केला असता त्याने मोबाइल उचलला नाही.

काही काळानंतर त्याने मोबाइल बंद केला. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन दादर रेल्वे पोलीस, दादर पोलीस, शिवाजी पार्क पोलीस, भोईवाडा पोलीस यांना दूरध्वनीबाबतची माहिती देऊन सतर्क राहण्याची सूचना करण्यात आली. पण तपासणीत तसे काहीही आढळले नाही. यापूर्वी सलमानच्या घराजवळ लॉरेन्स बिष्णोईच्या नावाने टॅक्सीची नोंदणी केल्याप्रकरणी उत्तर प्रदेशातील २० वर्षीय तरूणाला वांद्रे पोलिसांनी अटक केली होती. रोहित त्यागी (२०) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून तो उत्तर प्रदेशातील गाझीयाबाद येथील रहिवासी आहे. त्याने गुंड लॉरेन्स बिष्णोईच्या नावाने अभिनेता सलमान खानचे घर असलेल्या गॅलेक्सी अपार्टमेंट येथून वांद्रे येथे जाण्यासाठी खासगी टॅक्सीची नोंदणी केली होती. याप्रकरणी आरोपी तरूणाला दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. केवळ मस्करी करण्याच्या उद्देशाने हा प्रकार केल्याचे त्याचे चौकशीत सांगितले होते.

## मी दादांसोबत, सुप्रिया सुळेंना जिंकवून शरद पवारांकडे येणार, एनसीपी नेत्याचे चॅलेंज

दैनिक आपला विदर्भ

**पंढरपूर/प्रतिनिधी** : माढा लोकसभेच्या जागेवरून महाराष्ट्राच्या राजकारणात दिवसेंदिवस वेगवेगळे ट्विस्ट येत आहेत. काहीच दिवसांपूर्वी देवेंद्र फडणवीसांची भेट घेतलेले उत्तम जानकर शरद पवारांच्या गळाला लागले आहेत. उत्तम जानकरांनी माढ्यात जाऊन धैर्यशील मोहिते पाटलांना पाठिंबा द्यायचा निर्णय घेतला आहे. आपण आता अजितदादांच्या गटात आहोत, पण बारामतीमध्ये अजितदादांचा पराभव करूनच आपण पक्ष सोडणार. बारामतीमध्ये सुप्रिया सुळे निवडून येईपर्यंत आणि घड्याळ चिन्ह घेऊन आल्यावरच मी शरद पवारांच्या पक्षात येणार, असे चॅलेंज उत्तम जानकर यांनी घेतले आहे.

# बुद्ध धम्म प्रसारासाठी धम्मदीक्षा मागण्याचा यशस्वी प्रयोग कारंजा येथे संपन्न

दैनिक आपला विदर्भ

■ नकूल उपाध्ये

**कारंजा** : तथागत भगवान बुद्धांनी दिलेला धम्म आणि त्याचा प्रचार प्रसार करणे हेतू डॉ.बाबासाहेब आंबेडकर लिखित बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथावर आधारित धम्मदीक्षा महानाट्यचा यशस्वी प्रयोग स्थानिक सन सिटी मुनलाईट कॉलनीत राणा अंभोर सोशल फोंडेशन आणि विशाखा महिला संघ यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त संपन्न झाला . या भव्य नाट्यप्रयोगात ३०कलाकारांनी आणि त्याच्या अभियानाने उपस्थित श्रोत्यांना आपल्या धम्माप्रती असलेले कर्तव्य आणि आचरण किती महत्वाचे आहे ; बुद्धकालीन संस्कृती किती प्राचीन आणि समजऊपोयोगी होती याचे






दर्शन घडविले .समंधीत क्रीयशन प्रस्तुत प्रा.अविष बनसोड दिग्दर्शित नाट्यात बुद्धांनी घेतलेल्या ७ धम्म दीक्षा बुद्धाचा गृहत्याग आणि त्यामागचे कारण विषद करताना राजा शुधोधन याची अवस्था मन हेलावून टाकणारी होती. यावेळी उपस्थितांच्या डोळ्यात अश्रुंच्या धारा लागल्या होत्या . या नाट्यप्रयोग तून दाखविण्यात आलेली दृष ही जिवंत वाटत होती अशा नाट्य प्रयोगाला सरवदुर पोचविण्यासाठी सामूहिक जबाबदारी घेण्याची भावना अनेकांनी व्यक्त केल्या.या नाट्य प्रयोगाला उदघाटक म्हणून अभियंता सुनील मेश्राम उपस्थित होते तर प्रमुख अतिथी समाजकल्याण सभापती अशोक डोंगरदिवे , महाराष्ट्र बहुजन पत्रकार संघाचे जिल्हा अध्यक्ष बंडु भाऊ इंगोले,माजी तालुका कृषी अधिकारी समाधान पडघान, ॲड.मिलिंद खंडारे,प्रा रामदास देवळे ,सागर अंभोरे,विजय रौराले ,यांची उपस्थिती होती .कार्यक्रमाचे प्रास्ताविक बंडूभाऊ इंगोले यांनी तर आभार विजय रौरांले यांनी मानले.

दैनिक आपला विदर्भ

आपला बुलढाणा

रविवार 4

21 एप्रिल 2024

# जिल्ह्यात आजपासून घरून मतदान

## ➤ मतदानासाठी १०१ पथके स्थापन ➤ टपाली मतपत्रिकेद्वारे होणार मतदान

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : लोकसभा निवडणुकीत प्रथमच दिव्यांग आणि ८५ वर्षावरील मतदारांना घरून मतदान करण्याची सुविधा देण्यात आली आहे. जिल्हाभरातून घरून मतदानाची मागणी नोंदणी नोंदविलेल्या २ हजार ८६३ मतदारांकडून रविवार, दि. २१ एप्रिलपासून मतदान करुन घेतले जाणार आहे. यासाठी १०१ स्वतंत्र पथक निर्माण करण्यात आले आहे.

मागणी नोंदविलेल्या दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांना घरून मतदानाची सुविधा देण्यात आली आहे. संबंधित मतदारांना मतदानाची आगाऊ सूचना देण्यात यावी. विहित केलेल्या दिनांक आणि कालावधीत मतदारांकडून मतदान करून घ्यावे. अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिल्या आहे.

येत्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत ८५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिक, तसेच ४० टक्क्यांपेक्षा जास्त दिव्यांगत्व असलेले दिव्यांग मतदारांच्या मागणीनुसार रविवारपासून घरपोच मतदान करण्याची सुविधा देण्यात येणार आहे. जिल्ह्यात २ हजार १७१ ज्येष्ठ नागरिक आणि ६९२ दिव्यांग असे एकूण २ हजार ८६३ मतदारांच्या घरी जाऊन मतदान पथकामार्फत मतदान करुन घेण्यात येणार आहे. मतदान टपाली मतपत्रिकेद्वारे होणार आहे. जिल्ह्यात दि. २१ ते २३ एप्रिल २०२४ दरम्यान सदर मतदान प्रक्रिया होणार आहे.



बुलडाणा विधानसभा मतदारसंघात ११२ ज्येष्ठ नागरिक, ८४ दिव्यांग असे १९६, चिखली विधानसभा मतदारसंघात ३१८ ज्येष्ठ नागरिक, ९६ दिव्यांग असे ४१४, सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघात ५३९ ज्येष्ठ नागरिक, ८९ दिव्यांग असे ६२८, मेहकर विधानसभा मतदारसंघात ८२० ज्येष्ठ नागरिक, २८३ दिव्यांग असे सर्वाधिक १ हजार १०३, खामगाव विधानसभा मतदारसंघात १२० ज्येष्ठ नागरिक, ८३ दिव्यांग असे २०३, जळगाव जामोद विधानसभा मतदारसंघात २६२ ज्येष्ठ नागरिक, ५७ दिव्यांग असे ३१९, असे २ हजार १७१ आणि दिव्यांग ६९२ असे एकूण २ हजार ८६३ मतदारांना घरपोच मतदान सुविधेचा लाभ देण्यात येणार आहे.

८५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग मतदार असलेल्या बुलडाणा विधानसभा मतदारसंघ येथे १९६ मतदारांसाठी १० पथक, चिखली येथे ४१४ मतदारांसाठी २० पथक, सिंदखेड राजा येथे ६२८ मतदारांसाठी १९ पथक, मेहकर येथे १ हजार १०३ मतदारांसाठी ३२ पथक, खामगाव येथे २०३ मतदारांसाठी १० पथक, जळगाव जामोद येथे ३१९ मतदारांसाठी १० पथक, असे एकूण १०१ पथक घरोघरी जाऊन मतदान प्रक्रिया राबवणार आहेत. या मतदान पथकामध्ये २ मतदान अधिकारी हे सूक्ष्म निरीक्षक, १ व्हिडीओग्राफर, १ पोलिस कर्मचारी यांचा समावेश आहे.

घरून मतदानाची प्रक्रिया पारदर्शीपणे, तसेच मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी उमेदवार स्वत: अथवा आपला प्रतिनिधी नियुक्त करुन मतदान प्रक्रियेचे निरीक्षण करु शकतील. याप्रक्रियेमध्ये मतदारांना टपाली मतपत्रिकेवर खूण करुन आपले मतदान नोंदविता येईल. तसेच मतदान नोंदविल्यानंतर मतदारांच्या बोटाला पक्की शाईची खूण करण्यात येणार आहे. तसेच या संपूर्ण प्रक्रियेचे चमूकडून चित्रीकरण करण्यात येईल.

अंध व्यक्तींसाठी मतदान करताना विशेष सोय करण्यात आली आहे. निवडणुकीत २१ उमेदवार आणि १ नोटा असल्याने मतपत्रिकेचे दोन भाग असणार आहे. एका मतपत्रिकेवर १६ उमेदवार आणि उर्वरीत उमेदवार दुसऱ्या मतपत्रिकेवर असणार आहे. अंध व्यक्तींसाठी ब्रेल लिपीतील मतपत्रिका पुरविण्यात येणार आहे. तसेच अंध दिव्यांग व्यक्तींना सोबत्याची मदत घेऊन देखील मतदान करता येणार आहे. दररोज मतदान संपल्यानंतर सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात सर्व पथकातील टपाली मतपत्रिकेचे एकत्रिकरण करण्यात येवून सर्व टपाली मतपत्रिकेचे पाकिटे हे निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयातील स्ट्राँगरुममध्ये सुरक्षित ठेवण्यात येणार आहे.

सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी मतदान पथकांचा तारखेनिहाय नियोजन केलेले असून त्यास मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी देण्यात आली आहे. याबाबत मतदार, तसेच उमेदवार यांनादेखील कळविण्यात आले आहे. तरी या कालावधीत उपरोक्त मतदारांनी बाहेरगावी जाऊ नये, अथवा गैरहजर राहू नये, तसेच सदर मतदान प्रक्रियेचा लाभ घेऊन सर्व मतदारांनी मतदान करावे व लोकशाहीच्या या उत्सवामध्ये आपला सहभाग नोंदवून लोकशाहीचा पाया मजबूत करण्यासाठी या घटकाने पुढे येऊन मतदान करावे, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

# भारताचे संवीधान भेट देत मुख्याध्यापकांनी केले आयुष वरघटचे कौतुक

दैनिक आपला विदर्भ

■ नकूल उपाध्ये

**कारंजा** : महामानव विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी देश वाशीयांसाठी अखंड भारताचे संवीधान लिहीले. हेच संविधान विद्यारंभ शाळेचे मुख्याध्यापक योगेश हागे; शाळेच्या व्यवस्थापिका रोशनी तळेकार यांना दि. २० एप्रील रोजी चि आयुष सतीषराव वरघट यांनी देऊन आपला जन्म दिवस विद्यालयात साजरा केला. याप्रसंगी आयुषचे वडील काजळेश्वरचे ग्राम विकास अधीकारी सतीष वरघट साहेब; आई शितल ताई वरघट यांची उपस्थीती होती. शाळेचे मुख्याद्यापक योगेश हागे यांनी आयुषचे शैक्षणीक कार्य ; नियमीतपणा; शांत नटखट स्वभाव; तथा अभ्यासात प्रगती बाबत त्यांच्या पालकांना अवगत करीत त्याचे कौतुक केले. मुख्याध्यापक योगेश हागे; शाळेच्या व्यवस्थापिका रोशनी तळेकार यांनी आयुषला जन्म दिनी शुभ चिंतले .



## संजय राऊत हिरो बनण्याच्या नादात झिरो बनले!

दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी** : ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत कायम बेताल वक्तव्ये करुन वादाच्या भोवर्यात सापडतात. आतापर्यंत त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर खालच्या पातळीवर केलेल्या टीकेमुळे भाजप नेते त्यांच्यावर प्रचंड संतापलेले आहेत. त्यातच आता भाजपच्या महिला उमेदवाराविषयी अत्यंत नीच दर्जाची टीका करुन त्यांनी स्वत:हून संकट ओढावून घेतले आहे. भाजपच्या अमरावतीतील उमेदवार नवनीत राणा यांच्याबाबत त्यांनी आक्षेपार्ह वक्तव्य केले. यावर नवनीत राणा व त्यांचे पती रवी राणा यांनी संजय राऊतांना खडे बोल सुनावले. यानंतर आता विधानपरिषदेच्या उपसभापती व शिवसेना नेत्या नीलम गोऱ्हे यांनीही संजंय राऊतांचा खरपूस समाचार घेतला आहे.

वाशिम जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना नीलम गोऱ्हे यांनी पत्रकार परिषद घेतली. त्यावेळी त्या म्हणाल्या, काही व्यक्तींना असं वाटतं की शिवराळ भाषा वापरून आपण हिरो ठरतो. मात्र, अशा प्रकारे महिलांबद्दल वाईट बोलणारे झिरो आहेत. राऊतांवर आरोप करणाऱ्या महिलांना त्यांनी किती गलिच्छ भाषेत शिवीगाळ केली ते आम्ही ऐकले आहे. आपल्या कुटुंबातील महिलांना चालतील तेच शब्द इतर महिलांबद्दल वापरावेत. राऊतांनी नवनीत राणांबद्दल वापरलेला शब्द पुन्हा वापरणे योग्य नाही. त्यामुळे त्यांचा अपमान होईल. म्हणून मी तो शब्द बोलत नाही. मात्र त्यांनी केलेला शब्द प्रयोग हा अतिशय चुकीचा आणि एका महिलेचा अवमान करणारा आहे, अशी टीका त्यांनी केली.

पुढे नीलमताई म्हणाल्या, एका महिलेबद्दल लोकप्रतिनिधीने अशा भाषेचा वापर करून टीका करणे हे अजिबात योग्य नाही. त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे योग्य राहील आणि याबाबत निवडणूक आयोग दखल घेऊन योग्य ती कारवाई करेल. अशा काही लोकांच्या सकाळच्या डराव- डरावमध्येही काही तथ्य नसते. त्यामुळे त्यांना फार गांभीर्याने घेण्याची गरज नसल्याची बोचरी टीका नीलम गोऱ्हे यांनी केली.

# मतदान करून या, मोफत आरोग्य तपासणी करा

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी** : लोकसभा निवडणुकीत मतदान करणाऱ्या मतदारांची मोफत आरोग्य तपासणी करण्याचा उपक्रम रिसोड येथील बाजड क्लीनिक चे संचालक डॉ सागर पाटील बाजड यांनी हाती घेतला आहे...

लोकसभा निवडणुकीत मतदान करणाऱ्या मतदारांची मोफत आरोग्य तपासणी करण्याचा उपक्रम रिसोड येथील डॉ सागर पाटील बाजड यांनी हाती घेतला आहे. हा उपक्रम मतदानाच्या दिवशी म्हणजे शुक्रवारी (२६ एप्रिल) रोजी राबवण्यात येणार असल्याचे डॉ. सागर बाजड पाटील यांनी सांगितले.

मतदान हा लोकशाहीतील मूलभूत अधिकार असून या अधिकाराचा जास्तीत जास्त रिसोड करांनी वापर करावा व लोकशाही बळकट करावी, या उद्देशाने रिसोड शहरासह तालुक्यातील

शासन प्रशासन उपलब्ध असलेल्या प्रत्येक माध्यमातून मतदानाविषयी जनजागृती करत आहे. नैतिकदृष्ट्या प्रत्येकाची ही जबाबदारी असून आमच्या वतीने हा उपक्रम हाती घेतला आहे मतदान हा लोकशाहीतील मूलभूत अधिकार असून या अधिकाराचा वापर जास्तीत जास्त नागरिकांनी मतदारांनी करावा या उद्धांत हेतूने आमच्या क्लिनिकच्या वतीने सदर उपक्रम राबविण्यात आला असून जास्तीत जास्त मतदारांनी मतदान करून आपल्या आरोग्याची तपासणी करून घ्यावी.

**-डॉ सागर बाजड**
**संचालक बाजड क्लीनिक**
**जिजाऊ चौक रिसोड**



बाजड क्लीनिक यांच्या संकल्पनेतून रिसोड शहरासह तालुक्यातील व परिसरातील मतदारांसाठी 'मतदान करा-बोट दाखवा-आणि मोफत आरोग्य तपासणी करा' हा उपक्रम २६ रोजी राबवला जाणार आहे. मतदारांमध्ये मतदानाविषयी जागृती व्हावी व त्याचबरोबर आरोग्यविषयीही जागरूकता निर्माण होण्यासाठी हा उपक्रम होत असल्याचे डॉ. सागर पाटील बाजड यांनी सांगितले. याशिवाय या दिवशी मोफत आरोग्य तपासणी,रक्त तपासणी सवलतीच्या दरात केले जाणार असल्य़ाचेही त्यांनी स्पष्ट केले.

# मोटारसायकल अपघातात बाप-लेक जखमी; खेर्डा जिरापुरे येथील घटना

दैनिक आपला विदर्भ

■ नकूल उपाध्ये

**कारंजा** : मोटारसायकल घसरून बापलेक जखमी झाल्याची घटना १८ एप्रिल रोजी दुपारीचे सुमारास नागपूर - संभाजी नगर रस्त्यावरील खेर्डा जिरापुरे येथे घडली. प्राप्त माहितीनुसार, सुरेश गावंडे ४२व मनिषा गावंडे १६ दोघेही रा.खेर्डा जिरापुरे अशी जखमींची नावे असून ते मोटरसायकलने एमएच ३७ ई ७६१६ आखतवाडा येथे जात होते. मार्गात अचानक नियंत्रण गेल्याने दुचाकी घसरून दोघेही खाली पडले व जखमी झाले.

दरम्यान, घटनेची खेडा जीरापुरे येथील मुख्याध्यापक पुरुषोत्तम म्हातारमारे व गणेश



भाऊ राऊत यांनी. तात्काळ श्री गुरु मंदिर रुग्णवाहिका सेवेचे रुग्णसेवक रमेश देशमुख यांना दिली. माहिती मिळताच जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज रुग्णवाहिका सेवा सेवक नितीन पाटील, श्री गुरुमंदिर रुग्णवाहिकेचे रुग्णसेवक रमेश देशमुख यांनी अपघातस्थळी पोहचून जखमींना उपचारासाठी स्थानिक उपजिल्हा रुग्णालयात कारंजा येथे भरती केले. तेथील वैद्यकीय अधिकारी अस्थिरोग तज्ञ डॉ मोरे सर यांनी प्रथमोपचारानंतर दोघांनाही पुढील उपचारासाठी अमरावती येथे पाठविण्यात आले आहे.

## मुंबईत घर विकत घेण्याचे स्वप्न होणार पूर्ण; म्हाडा 2000 घरांसाठी काढणार लॉटरी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : मुंबईत घरांच्या किंमती गगनाला भिडल्या आहेत. त्यामुळे मुंबईत स्वत:चे घर घेणे अनेकांसाठी स्वप्नवत वाटते. मुंबई शहर किंवा उपनगरात कमी खर्चात घर मिळावे ही प्रत्येकाची इच्छा असते. जर तुम्ही मुंबईत घर खरेदी करण्याचा विचार करत असाल तर तुमच्यासाठी आनंदाची बातमी आहे. योग्य दरात मुंबईत स्वत:चे हक्काचं घर विकत घेऊ शकता. कारण महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या मुंबईत सप्टेंबरमध्ये सुमारे दोन हजार घरांसाठी लॉटरी काढण्याची दाट शक्यता आहे. तसेच या लॉटरीमध्ये गोरेगाव येथील गृह प्रकल्पातील पॉश घरांचा समावेश असणार आहे.

दरम्यान गेल्यावर्षी मुंबई मंडळाची लॉटरी काढण्यात आली होती. त्यामध्ये ४०८२ घरांसाठी १.२२ लाख लोकांनी अर्ज केले होते. ज्या अर्जदारांना सोडत काढता आली नाही त्यांच्यासाठी यंदा सुवर्णसंधी आहे. म्हाडाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, मुंबईतील विविध भागातील तयार घरांची माहिती गोळा केली जात आहे. मुंबईत येत्या काही महिन्यांत जवळपास २ हजार घरे तयार होण्याची अपेक्षा आहे.

## राज्य महामार्गावर एस टी बस दुचाकी चा अपघात एक ठार तर एक गंभीर

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**लोणार** : नागपूर ते मुंबई राज्य महामार्गावर दुसरबीड नजीकच्या नगरमाळ शिवारात एसटी बस व दुचाकीची धडक होऊन अपघात झाल्याची दुर्दैवी घटना. आज दि. २० एप्रिल, शनिवारी सकाळी १०.०० वा. सुमारास सावित्रीबाई मंगल कार्यालयासमोर घडली ह्या घटनेत एक जण जागीच ठार तर एक जण गंभीर जखमी झाला आहे.

याबाबत सविस्तर असे की, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या जालना डेपोची बस (क्र. एम. एच. २० बीएल २६१० ही जालन्यावरुन गडचिरोलीकडे जात होती तर दुचाकी (क्र. एम. एच.





२८ बीपी १९३३) ही दुचाकी बिबी कडून दुसरबीडकडे जात होती. दुचाकीवरील अरुण वामनराव पोहेकर, रा. मानेगाव खालसा, जि. जालना वय ६० वर्षे हे जागीच ठार झाले. तर त्यांच्या सोबत असलेले चिखली तालुक्यातील मुरादपूर येथील आश्रुबा गाडेकर हे जखमी झाले त्यांना ग्रामीण रुग्नालय बिबी येथे नेण्यात आले अपघाताचा पुढील तपास बिबी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संदीप पाटील पो का अरुण सानप शिवाजी दराडे रविंद्र गोरे यांच्यासह त्यांचे कर्मचारी करीत आहेत.